आर बी आय/ २००६-०७/१३९
डी बी ओ डी. क्र. एल ई जी. बीसी. ३२/ ०९.०७.००५/ २००६-०७ ऑक्टोबर ४, २००६

प्रति,
सर्व अनुसूचित व्यापारी बँकां
( आर आर बीज सोडून )

प्रिय महोदय,

**ग्राहक सेवा - बँकेच्या बचत खात्याच्या ग्राहकांना (व्यक्तींना) पासबुके न दिली जाणे**

आमच्याकडे वरिष्ठ नागरिक संघासह इतर अनेक ग्राहकांकडून निवेदने येत आहेत की अनेक बँकांनी बचत खात्याच्या खातेदारांना (व्यक्तींना) पासबुके देणे बंद केले आहे.

असेही निर्देशित करण्यात आले आहे की पासबुक पध्दत बंद करण्याचा हा निर्णय केवळ एकतर्फी असून त्यामुळे खातेदारांची खूप अडचण होते. आमच्या असेही निदर्शनास आले आहे की या बँका बचत खात्याच्या खातेदारांना, त्यांच्या खात्याचे लेखा-विविरणपत्र, आमच्या पिरिपत्रक डी बी ओ डी. क्र. ७४/०९.०७.००५/२००४-०५ दि. एप्रिल १०,२००४ मध्ये निर्देशित केल्यानुसार दरमहा देण्या ऐवजी दर तीन महिन्यांनी दिले जात आहे.

२. या संदर्भात येथे हे सांगणे योग्य ठरेल की पासबुक म्हणजे केलेल्या व्यवहारांचा 'तयार नोंदनामा ' (रेडी-रेकनर) असतो आणि ते सुटसुटीत / आटोपशीर आकारात असल्याने, छोट्या ग्राहकासाठी विवरणपत्रापेक्षा अधिक सोयिस्कर ठरते. विवरणपत्रांच्या काही मुलतःच अडचणी असतात - म्हणजे –
(अ) ती नियमितपणे दिली गेली पाहिजेत.
(ब) त्यातील प्रारंभीची शिल्लक ही आदल्या/ मागच्या विवरणपत्राच्या अखेरच्या शिलकीशी जुळली पाहिजे.
(क) टपालामध्ये गहाळ होण्याची शक्यता ही असतेच. आणि त्याची बदली प्रत (डुप्लिकेट) मिळविण्यासाठी खर्च व त्रास होतो.
(ड) दोन विवरणपत्रामधील 'इंटर- रेग्नम ' मधील एटीएमच्या स्लिप्स मिळत असल्या तरी त्यावरून केलेल्या व्यवहारांची पूर्ण नोंद मिळू शकत नाही.
(ई) याशिवाय ज्यांची कॉम्प्युटर/ इंटरनेट पर्यंत पोच नाही असे लहान ग्राहक खूप मोठ्या संख्येने आहेत. म्हणून अशा लहान ग्राहकांना पासबुक न दिले जाणे म्हणजे त्यांना वित्तविषयक बाबींमधून वगळणेच ठरेल.

३. **यासाठी बँकांना सूचित करण्यात येत आहेत की त्यांनी त्यांच्या सर्व बचत खातेदारांना (व्यक्ती) न चुकता पासबुक सुविधा द्यावी**. बँक खात्याचे विवरणपत्र ग्राहकाला देऊ करत असेल व त्यासाठी ग्राहक राजी असेल तर, बँकांनी, आमचे परिपत्रक डी बी ओ डी. क्र. एलईजी. बीसी ७४/०९.०७.००५/ २००४-०५ दि. एप्रिल १०, २००४ मधील शर्तींना अनुसरून असे विवरणपत्र दरमहा पाठवावे अशा पासबुकाचा किंवा विवरणपत्राचा आकार/शुल्क ग्राहकाला लावला जाऊ नये.

४. कृपया पोच द्यावी.

आपला विश्वासू,

( प्रशांत सरन)
प्रभारी मुख्य महाव्यवस्थापक